पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११ ०१८ नगरसचिव कार्यालय,
क्रमांक - नस/०३/कावि/५६९/२०१६
दिनांक – २२/०७/२०१६

प्रति,
मा**..........................................,**
सदस्य, स्थायी समिती,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११ ०१८.

विषय - पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची साप्ताहिक सभा दिनांक - २६/०७/२०१६ रोजी आयोजित केले बाबत....

महोदय/महोदया,

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची साप्ताहिक सभा मंगळवार दिनांक २६/०७/२०१६ रोजी दुपारी २.३० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सोबत सभेची कार्यपत्रिका जोडली आहे. सभेस आपण उपस्थित रहावे, ही विनंती.

आपला विश्वासू,



**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत - १) सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी
२) कार्यालयीन नोटीस बोर्ड

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-४११ ०१८.

मा.स्थायी समिती

**कार्यपत्रिका क्रमांक – २३४**

दिनांक - २६/०७/२०१६ वेळ – दुपारी २.३० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची साप्ताहिक सभा मंगळवार दिनांक २६/०७/२०१६ रोजी दुपारी २.३० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सभेत खालील कामकाज होईल.

----------

दिनांक १९/०७/२०१६ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक २३३) चा सभावृतांत कायम करणे.

विषय क्र.१) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सुरक्षा विभागामार्फत मनपाच्या विविध मिळकती/उदा. करसंकलन विभागीय कार्यालय, पाणी पुरवठा, कार्यशाळा इ. ठिकाणी सुरक्षा व्यवस्थेचे काम ठेकेदारी पध्दतीने ई-निविदा सुचना क्र. २/२०१४-२०१५ अन्वये ४३१ रखवालदार मदतणीस कर्मचारी पुरवून कामकाज चालू आहे. परंतू JnNURM - BSUP शहर झोपडपट्टी पुर्नवसन अंतर्गत से.क्रं.२२ निगडी येथे ४३ इमारती बांधण्यात आलेल्या असून संरक्षण खात्याच्या रेड झोन हद्दीमध्ये येत असल्याने मा.उच्च न्यायालय,मुंबई सुरु असलेले बांधकाम तसेच ठेवणेबाबत व पुर्ण झालेल्या इमारतींचे वाटप न करणेबाबत स्थगिती आदेश दिलेले आहेत, परंतू सदर ठिकाणी भविष्यामध्ये अनैतिक बाबी घडुन अपघात होवू नये व इमारती सुरक्षित राहणेकामी स्थापत्य BSUP प्रकल्प विभागाकडील पत्र क्रं स्थआ/BSUP प्र/१७९/२०१६ दि.२४/५/२०१६ चे पत्रान्वये विभागास कळविले आहे, त्यानुसार सदर ठिकाणची सुरक्षा व्यवस्था करणे करीता १) मे.युनिक डेल्टा सिक्युरिटी फोर्स प्रा.लि.यांना ०५, २) मे.नॅशनल सिक्युरिटी सर्व्हिसेस यांना ०७, व ३) मे.शुभम उद्योग यांना ०६ प्रमाणे एकूण जादा १८ रखवालदार मदतनीस कर्मचारी पुरविणे कामी मान्यता देवून ई-निविदा सुचना क्र.२/२०१४-२०१५ च्या अटी व शर्ती नुसार व मान्य केलेल्या दरानुसार व वेळोवेळी जानेवारी, जुलै मध्ये लागू होणा-या महागाई भत्ता (विशेष भत्ता) नुसार रखवालदार मदतनीस कर्मचारी यांची स्थायी समीतीने मान्यता दिलेनंतर विभागाच्या सोयीच्या तारखेपासून ते दिनांक ३१/१२/२०१६ अखेर तैनात करणेकामी त्या वेतनपोटी होणारे खर्चास मान्यता देणे बाबत विचार करणे.

(दिनांक २६/०७/२०१६ च्या सभेत घेणेच्या निर्णयाप्रमाणे )

विषय क्र. २) पर्यावरण अभियांत्रिकी विभागाकडील नि.नो.क्र.मुख्यालय/११/४/२०१५-१६ मधील मोशी कचरा डेपोसाठी नेरी, नागपुर या संस्थेने बफर झोन संबंधी दिलेल्या अहवालामध्ये उपाययोजना राबविणेकामी आवश्यक कामे करणे २. डेपोभोवती ग्रीन बेल्ट तयार करणे या कामासाठी मे. बी. व्ही. जी. इंडिया लिमिटेड यांचे कडुन नि.र.रु. १,३९,८५,३८३/- (अक्षरी र.रु.एक कोटी एकोणचाळीस लाख पंच्याऐंशी हजार तीनशे त्र्याऐंशी फक्त) पेक्षा -३.००% कमी या दराने करुन घेऊन यांचेसोबत करारनामा करुन कामाचे आदेश देणेबाबत विचार करणे.

(दिनांक २६/०७/२०१६ च्या सभेत घेणेच्या निर्णयाप्रमाणे)

विषय क्र.३) मनपाच्या स्थापत्य् विभागाकडील निनो.क्र. ४३/१२/१५-१६ प्रभाग क्र.४३ मधील स्मशानभुमीचे विस्तारीकरण करणेकामी मे.व्हि टु एस ट्रायकॉन नि.र.रु. ३५०१३२६/- (अक्षरी र.रु. पस्तीस लाख एक हजार तीनशे सव्वीस फक्त) पेक्षा २५.८६% कमी या ठेकेदाराकडुन निविदा मंजुर दराने र.रु.२७,२५६७७/- पर्यंत काम करुन घेणेस तसेच नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ /घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

(दिनांक २६/०७/२०१६ च्या सभेत घेणेच्या निर्णयाप्रमाणे)

विषय क्र.४) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रात विविध ठिकाणाहून शहरांचे विविध ठिकाणी मोठया प्रमाणात वाहनांची रोज ये - जा अहोरात्र चालू असते त्यासाठी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील विविध (सिग्नल असलेले व सिग्नल नसलेले) जास्त वर्दळीचे चौक येथील रहदारी सुरळीतपणे चालू रहाणेसाठी वाहतूक पोलीसांचे मदतीकरीता ठेकेदारी पध्दतीने १ (एक) वर्ष कालावधीसाठी १०० ट्रॅफिक वार्डन मदतनीस कर्मचा-यांची नेमणूक केलेली आहे परंतू सहा.पोलिस आयुक्त वाह. ३ पुणे शहर यांचे कडील जावक क्र.४४१/२०१६ दि २२/०४/२०१६ अन्वये मनपा हद्दीतील पुर्वीच्या ज्या चौकामध्ये व रस्त्यावर रहदारी कमी होती ते चौक व रस्ते रहदारी वाढल्याने वाहतूक कोंडी समस्या सोडवून वाहतूक नियमन करण्यासाठी सध्या असलेल्या ट्रॅफिक वार्डन अपुरे पडत असल्याने ५० ट्रॅफिक वार्डन कर्मचारी १) मे.एल.एम.सी.सि.फोर्स.प्रा.लि. यांना ३७ ट्रॅफिक वार्डन व २) मे.श्रीकृपा सर्व्हीसेस प्रा.लि., यांना १३ ट्रॅफिक वार्डन कर्मचारी नियुक्त करणे कामी मा.स्थायी समितीने मान्यता दिलेनंतर सुरक्षा विभाग कामकाजाच्या सोयीनुसार ते दिनांक ३१/१२/२०१६ अखेर निविदेतील अटी-शर्ती नुसार ५० ट्रॅफिक वार्डन कर्मचारी तैनात करणेकामी त्या वेतनपोटी होणारे खर्चास मान्यता देणेबाबत विचार करणे.

(दिनांक २६/०७/२०१६ च्या सभेत घेणेच्या निर्णयाप्रमाणे)

विषय क्र.५) पिंपरी चिचंवड महानगरपालिका क क्षेत्रीय कार्यालयातर्गत सांगवी दापोडी व नवी सांगवी येथील पवना नदीपात्रातील जलपर्णी/हायसिंथ काढणेकामी मा.आयुक्त यांचे कडील आदेश क्र.कक्षेका/आ१५/कावि/४३५/१६ दि.०६/०६/२०१६ अन्वये र.रू. १,००,०००/- (अक्षरी र.रू.एक लाख फक्त) आगावू घेतलेली होती. सदरचे कामकाज मा.आयुक्त साहेब यांनी दिलेल्या सुचनेनुसार थेट पध्दतीने विभागामार्फत रोजाने कर्मचारी लावून व जे.सी.बी.च्या सहाय्याने करणेत आलेले आहे. दि.११/०६/२०१६ ते २२/०६/२०१६ अखेर एकूण १२६.५ मनुष्यबळाचा वापर करून र.रू. ५०६००/- इतका खर्च करणेत आला असून दि.११/०६/२०१६ ते २२/०६/२०१६ अखेर एकूण ७६ तास जे.सी.बी.वापर करून र.रू. ४९४००/- इतका खर्च करणेत आलेला आहे. सदरचा एकूण खर्च र.रू.१,००,०००/- इतका प्रत्यक्ष खर्च झालेला आहे. तरी पवना नदीपात्रातील हायसिंथ काढणेकामी प्रत्यक्ष झालेला एकूण र.रू.१,००,०००/-(अक्षरी र.रू.एक लाख फक्त) चे खर्चास कार्येत्तर मान्यता देणेबाबत विचार करणे.

(दिनांक २६/०७/२०१६ च्या सभेत घेणेच्या निर्णयाप्रमाणे)

विषय क्र.६) मा. महिला बाल कल्याण समिती ठराव क्र. २१ दि. १३/७/२०१६ अन्वये ई.निविदा सुचना क्र.२ २०१४-२०१५ नुसार सन २०१६-२०१७ मध्ये महिला मुलींना योग प्रशिक्षण देणे, ही योजना राबविणे बाबत, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील ईच्छुक महीला व मुलींना योग प्रशिक्षणाचा प्रति लाभार्थी र.रू.२२८.५०/- या दरात लवकरात लवकर लाभार्थींना प्रशिक्षणाचा लाभ मिळणे कामी पतंजली योगपिठ ट्रस्ट यांना सन २०१६-२०१७ अखेर निविदेत नमुद केले नुसार होणा-या प्रत्यक्ष खर्चास व योजना अंमल बजावणी कामी मान्यता मिळणे कामी सदर संस्थेचा र.रू. २२८.५० या प्रती लाभार्थी या दराने योग प्रशिक्षण देणे व सदर योजनेत बदल व दुरूस्ती करणेचे अधिकार मा.आयुक्त सो. यांना देणेबाबत विचार करणे.

(दिनांक २६/०७/२०१६ च्या सभेत घेणेच्या निर्णयाप्रमाणे)

विषय क्र.७) मनपाचे क्रीडा विभागासाठी विविध प्रकारचे व्यायामशाळा साहित्य खरेदीकामी ई निविदा सुचना क्र. 7/2016-17 अन्वये, ऑनलाईन निविदा दर मागविणेत आले होते त्यामधील लघुत्तम निविदाकार मे. सुमीत स्पोर्ट्स अण्ड फिटनेस इक्वीपमेंट यांचे 47 बाबींचे दर र.रु. 31,58,510/- ,मे. डी एस बॉडीमास्टर इंजिनिअरिंग यांचे 11 बाबींचे दर र.रु. 14,83,267/-, मे. ग्लोबल फिटनेस यांचे 2 बाबींचे दर र.रु. 32,280/- व मे. गिनिज स्पोर्ट्स यांचे 1 बाबींचे दर र.रु. 11,850/- असे एकूण 61 बाबींचे दर र.रु. 46,85,907/- चे दर स्विकृत करुन सदर पुरवठाधारकांकडून करारनामा करुन पुरवठा आदेश निर्गत करणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

(दिनांक २६/०७/२०१६ च्या सभेत घेणेच्या निर्णयाप्रमाणे)

विषय क्र.८) मनपाच्या ड क्षेत्रिय कार्यालय स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.४-१२/२०१५-१६ अन्वये पिंपळे निलख परिसरात टँकरव्दारे पाणीपुरवठा करणे कामी मे.सुदर्शन वॉटर सप्लायर्स नि.र.रु ३,४९,०००/- (अक्षरी र.रु तीन लाख एकोणपन्नास हजार फक्त) पेक्षा -०३.००% कमी, या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने र.रु ३,३८,५३०/- पर्यंत काम करुन घेणेस, तसेच नियमानुसार व निविदेतील निविदा अटी प्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कलावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील. या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर कामाचा करारनामा करुन कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणे.

विषय क्र.९) मनपाच्या ड क्षेत्रिय कार्यालय स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.४-६/२०१५-१६ अन्वये रहाटणी श्रीनगर परिसरात टँकरव्दारे पाणीपुरवठा करणे. कामी मे.सुदर्शन वॉटर सप्लायर्स नि.र.रु ३,४९,०००/- (अक्षरी र.रु तीन लाख एकोणपन्नास हजार फक्त) पेक्षा -०३.००% कमी, या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने र.रु ३,३८,५३०/- पर्यंत काम करुन घेणेस, तसेच नियमानुसार व निविदेतील निविदा अटी प्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कलावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील. या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर कामाचा करारनामा करुन घेणेत आलेला असलेने त्याचे अवलोकन करणे.

विषय क्र.१०) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे बांधकाम परवनागी विभागासाठी कार्यान्वित असेलेली Auto DCR ही संगणक प्रणालीची पुढील दोन वर्षा करीता देखभाल दुरुस्ती करणे, बांधकाम परवानगी विभागातील रोजचे कामकाज साठी एक तांत्रीक मनुष्यबळ पुरवणे व Auto DCR या संगणक प्रणालीत मनपाच्या डीसीआर नियमानुसार वेळोवेळी होणारे आवश्यक बदल करणे चे कामकाज मे. सॉफ्टटेक इंजिनियर्स प्रा.लि., यांना करारनामा करून देण्यास व त्याकरीता येणा-या एकुण दोन वर्षाकरीता र.रू. १३,९४,०००/- चे खर्चास मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्र.११) मनपा उदयान विभागाकडील कोटेशन नोटीस क्र.01/2016-17 करीता मनपाचे उद्यान विभागासाठी शेणखत पुरविणेकामी मे.निषांत एंटरप्रायझेस कोटेशन नोटीस र.रू.1,99,883/- (अक्षरी र.रू.एक लाख नव्व्याण्णव हजार आठशे त्र्याऐंशी फक्त) अंदाजपत्रकिय दरापेक्षा (2% ने कमी )कोटेशन स्वीकृत करणेत आले असून आदेश उदयान/6/कावि/275/2016 दि.16/06/2016 अन्वये कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणे.

विषय क्र.१२) मा. क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती सभा दिनांक २०/०७/२०१६ ठराव क्रमांक ६७ नुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या नागरवस्ती विकास योजना विभागा मार्फत महिला व बालकल्याण योजने अंतर्गत महिला/मुलींना कुंगफु-कराटे प्रशिक्षण देणे ही योजना वस्ती पातळीवर राबविणेकामी प्रति लाभार्थी – महिला/मुली वयोगट 5 ते 16 प्रति लाभार्थी र.रू.147/- निविदेनुसार अंदाजित 48.99 % कमी,

महिला/मुली वयोगट 17 ते 26 प्रति लाभार्थी र.रू.148/- निविदेनुसार अंदाजित 49.33% कमी,

महिला/मुली वयोगट 27 ते 45 प्रति लाभार्थी र.रू.149/- निविदेनुसार अंदाजित 49.66 % कमी

या दरात अ, ब, क, ड, ई व फ क्षेत्रीय कार्यालयाच्या कार्यक्षेत्रातील महिला/मुलींना कुंगफु-कराटे प्रशिक्षण पुणे डिस्ट्रीक्ट स्पोर्टस कराटे असोशिएशन चिंचवड यांचे मार्फत पिं.चिं.म.न.पा. परिसरातील प्रस्तावात नमुद महिला/मुली लाभार्थीसाठीचे पात्रता निकष (अटी व शर्ती) ची पुर्तता करणा-या प्रस्तावात नमुद अभ्यासक्रमानुसार महिला/मुलींना वस्ती पातळीवर दि. 31/3/2017 अखेर पर्यंतच्या कालावधित कुंगफु-कराटे प्रशिक्षण रोज दीड तास या प्रमाणे एकूण 20 दिवसाच्या (30 तास) प्रति लाभार्थी प्रस्तावात नमुद वयोगटानुसार प्रशिक्षण योजना राबविणे कामी निविदेनुसार होणा-या रक्कमेस अथवा येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेकामी व आवश्यकते नुसार सदर योजनेत बदल दुरूस्ती करण्याचा व त्यानुसार लाभ देणेचा अधिकार मा.आयुक्त सो. यांना देणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्र.१३) मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती सभा दि.२०/७/२०१६ ठराव क्र.६८ नुसार मा.महापालिका सभा ठराव क्र.१२०६ दि.२०/१०/२०११ व मा.आयुक्त यांचेकडील आदेश क्र.क्रीडा/७/कावि/१८८/२०१२, दि.०४/०७/२०१२ मध्ये नमुद केलेप्रमाणे क्रीडा धोरण व सदर आदेशातील अट क्र.१० मध्ये खेळाडू दत्तक योजनेअंतर्गत निवड झालेल्या खेळाडूने सलग २ वर्षात राज्य, राष्ट्रीय, व आंतरविद्यापीठ स्तरावर प्राविण्य न मिळविल्यास अशा खेळाडूंना तेथून पुढे या योजनेचा लाभ दिला जाणार नाही असे नमुद आहे. त्यानुसार खेळाडू दत्तक योजना २०१४-१५ व २०१५-१६ चे लाभार्थी ४५ खेळाडूंच्या प्राविण्याबाबत संबंधित क्रीडा पर्यवेक्षक व क्रीडा अधिकारी यांनी तपासणी केली असता प्रस्तावात नमुद १६ खेळाडू पात्र असा अहवाल क्रीडा विभागास दिलेला आहे. १६ पात्र खेळाडूंना खेळाडू दत्तक योजना २०१६-१७ चा लाभ एक वर्षाकरिता देणेस व त्याकामी येणा-या र.रु.२६,३४,४००/- चे खर्चास व सदरचा खर्च खेळाडू दत्तक योजना या लेखाशिर्षावर खर्ची टाकणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्र.१४)मनपाचे आरोग्य विभागास मॉस्किटो किलिंग सिस्टिम मशीन खरेदीकामी ई-निविदा क्र.१४/२०१६-१७ अन्वये ऑनलाईन निविदा दर मागविणेत आलेले होते. त्यामध्ये

प्राप्त निविदाकारापैकी मे. इंद्रनिल टेक्नॉलॉजीस यांचे मॉस्किटो किलिंग सिस्टिम मशीन चे सर्वात लघुत्तम दर र.रू. २१०५४२/- प्र.नग प्राप्त झालेले आहेत. प्राप्त लघुत्तम दराने आरोग्य विभागास तुर्तास ६ नग मॉस्किटो किलिंग सिस्टिम मशीन खरेदी कामी एकूण र.रू. १२,६३,२५२/- इतका खर्च येणार आहे. प्राप्त लघुत्तम दर हे मनपा अंदाजपत्रकीय दर एकूण र.रू. १२,६३,२५२/- इतके समान आहेत. सदर दर स्विकृत करणेस मान्यता दिलेली असून त्यांचेबरोबर करारनामा करून पुरवठा आदेश निर्गत करणेकामी मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्र.१५)मनपाचे आठ रुग्णालयाकरिता फिटेल डॉपलर खरेदी करणेकामी ई-कोटेशन नोटीस क्र २२/२०१६-१७ अन्वये दरपत्रके मागविणेत आले होते. त्यानुसार प्राप्त दरपत्रकांमध्ये मे. महालक्ष्मी डिस्ट्रीब्युटर्स, पुणे यांनी सादर केलेले दरपत्रक र.रु.२९९९/- (सर्व करासह) लघुत्तम प्राप्त् झाले आहेत. मे. महालक्ष्मी डिस्ट्रीब्युटर्स, पुणे यांचेकडुन फिटेल डॉपलर करिता प्रति नग र.रु.२९९९/- नुसार एकुण ८ नग खरेदीकरिता र.रु.२३,९९२/- करारनामा न करता खरेदी करणेस व सदर साहित्य खरेदी करणेकामी होणारा खर्च र. रु. २३,९९२/- (अक्षरी र.रू. तेवीस हजार नऊशे ब्यान्नव फक्त) चे खर्चास मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्र.१६)मनपाच्या विद्युत मुख्य कार्यालयाकडील नि.नो.क्र. 18/2015-16 मधील अ.क्र. 20 अन्वये ताथवडे पुनावळे प्रभागातील अंतर्गत रस्त्यावर आवश्यकतेनुसार दिवाबत्ती व्यवस्था बसविणे कामी मे. अबान इलेक्ट्रिकल वर्क्स नि.र.रू. 11,99,999/- (अक्षरी र.रू. अकरा लाख नव्यान्नव हजार नऊशे नव्यान्नव फक्त) पेक्षा 39.56 % कमी या ठेकेदाराबरोबर करारनामा करून कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणे.

विषय क्र.१७)प्रभाग क्रमांक ४२,४९,५०,५१,५३ मधील दैनंदिन शौचालय साफसफाईकामी या पूर्वी मा.आयुक्त यांचेकडील आदेश क्र. आ/४/कावि/१८४/२००८ दि.६/५/२००८ नुसार क्षेत्रीय अधिका-यांना प्रदान केलेल्या अधिकारानुसार स्थानिक बेरोजगारांच्या सहकारी संस्था, स्वयं सेवी संघटना यांचे कडून साफसफाईचे काम करारनामा करुन घेणेत येते. सदर आदेशानुसार असे करार जास्तीत जास्त ११ वर्षापर्यतच्या कालावधीसाठी करता येतात. त्यानुसार ब क्षेत्रीय कार्यालयाच्या कार्यक्षेत्रातील अशा प्रकारचे काम करणा-या संस्था मे.समृद्धभारत स्वयं रोजगार सह सेवा संस्था मर्या. व मे. दीन महिला आधार रोजगार संस्था यांची करारनाम्याची मुदत दिनांक ३१/३/२०१६ रोजी संपुष्टात आलेली आहे. त्यामुळे सदर संस्थांना पुढील ६ महिन्यांसाठी मुदतवाढ देणेस वरील आदेशात नमूद केलेप्रमाणे प्रति सीट २५०/- या दराने करुन घेणेस व याकामी येणा-या अपेक्षित अंदाजे खर्च र.रु. ३,२७,०००/- (अक्षरी र.रू. तीन लाख सत्तावीस

हजार फक्त) स्विकारणेबाबत मा.आयुक्त दिनांक-२१/५/१६ व दिनांक २/७/१६ च्या मान्य प्रस्तावानुसार कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणे.

विषय क्र.१८)मनपाच्या विद्युत मुख्य कार्यालयाकडील नि. नो. क्र. 23 / 2015 - 2016 मधील अ. क्र. 10 अन्वये वाकड उपविभागातील रस्त्यावरील नियोजित रस्ता दुभाजकात दिवाबत्ती व्यवस्था करणेकामी मे. यश इलेक्ट्रोलाईन नि.र.रू. 11,55,631/- (अक्षरी र.रू. अकरा लाख पंच्चावन हजार सहाशे एकतीस फक्त) पेक्षा 41.43 % कमी या ठेकेदाराबरोबर कामाचा करारनामा करून कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणे.

विषय क्र.१९)पिंपरी चिंचवड महानगरपालिका क क्षेत्रीय आरोग्य विभागातील कचरावाहतुक विभागामध्ये वाहनासाठी टायर ट्युब खरेदी कामी मा.आयुक्त यांचे कडील आदेश क्र.कक्षेका/आ१५ब/कावि/९२५/१५ दि.१४/१०/२०१५ अन्वये र.रू.४६,०९७/- (अक्षरी र.रू. शेहचाळीस हजार सत्याण्णव फक्त) आगाऊ रक्कम घेणेत आलेली होती. आरोग्य विभागासाठी टायर ट्युब खरेदीकामी मे.सिएट लि., कंपनी यांचेकडुन आदेश क्र.कक्षेका/आ१५ब/कावि/९२५/१५ दि.१४/१०/२०१५ अन्वये खरेदी केलेनुसार कार्यशाळा विभागामार्फत वाहनांना टायर-ट्युब बसवणेत आलेले आहे. वाहनासाठी टायर ट्युब खरेदी कामी र.रू.४६०९७/- आगाऊ रक्कम घेणेत आली होती. त्यापैकी र.रू.४४६२१/- प्रत्यक्ष खर्च झालेला आहे. उर्वरीत र.रू. १,४७६/- म.न.पा. कोषागरात पावती क्र. बी-४९७ दि. १५/१२/२०१५ अन्वये जमा केलेले असल्याने एकूण झालेला खर्च र.रू.४६०९७/- (अक्षरी र.रू. शेहचाळीस हजार सत्याण्णव फक्त) चे खर्चास मान्यता देणेबाबत विचार करणे.

**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११ ०१८ नगरसचिव कार्यालय,
क्रमांक - नस/०३/कावि/५६९/२०१६
दिनांक - २२/०७/२०१६.

टिप - प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची विषयपत्रे (डॉकेटस) नगरसचिव कार्यालयात वाचणेसाठी ठेवणेत आलेली आहेत.